ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख २८ जुलै, १९५४ | अंक १९

## विविध माहिती

**चीन-व्हिएटमिन्ह व्यापारी करार**—चीन आणि व्हिएट-मिन्ह ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार करण्यांत आला आहे. चीन व्हिएट-मिन्ह सरकारला कापूस, यंत्रें, वाहतुकीची यंत्रसामुग्री, वाहतुकीचीं साधनें, इत्यादी पुरविणार आहे. व्हिएट-मिन्ह चीनला चहा, कॉफी, कातडीं, इत्यादी कच्चा माल पुरविणार आहे.

**रशिआ-जपान व्यापारी करार**—दहा जपानी व्यापारी कंपन्यांनीं टोकिओंत आलेल्या रशिअन व्यापारी प्रतिनिधी-मंडळाशीं व्यापारी करार केल्याची वार्ता आहे. १९५५ साल-अखेर ८० लाख डॉलर्सच्या मालाची देवाण-घेवाण करण्याचा हा करार आहे. रशिआ जपानी कंपन्यांना लाकूड, मँगेनीझ, कोळसा व तेल पुरविणार आहे. जपान रशिआसाठी दोन बोटी बांधणार आहे व दोन बोटींची दुरुस्ती करणार आहे.

**ताजमहालजवळ बंधारा**—ताजमहालजवळ यमुना नदीला बांध घालण्याची योजना आग्रा म्युनिसिपालिटीनें आखली आहे. आग्रा वॉटरवर्क्सपासून ताजमहालपर्यंत ४ मैल लांबीचें एक तळें ह्या बंधाऱ्यानें निर्माण होईल आणि त्यामुळें ताजमहालाला सुंदर पार्श्वभूमीची प्राप्ति होईल. ह्या तलावामुळें आग्रा शहराला उन्हाळ्यांत पाण्याचा पुरवठा होईल.

**४५,००० रुपयांचा गालिचा**—आग्रा येथील एका व्यापारी कंपनीजवळ एक मूल्यवान गालिचा आहे. ह्या गालिच्यांत निर-निराळ्या ४५ प्रकारचीं १,८०० रत्नें बसविलेलीं आहेत. अमेरिकेंतील प्रमुख शहरांतून दाखविण्यासाठी म्हणून तो विमानानें नुकताच न्यूयॉर्कला धाडण्यांत आला. गालिच्याची किंमत वाहतुकीसाठीं म्हणून ४५,००० रुपये धरण्यांत आली आहे.

**इराणमधील तेलाची विक्री**—इराणमधील तेलाची विक्री करण्यासंबंधीं आठ आंतरराष्ट्रीय तेल कंपन्यांची संघटना आणि इराणचें सरकार ह्यांच्यांत तात्त्विक एकमत झालें आहे. अँग्लो-इराणिअन तेल कंपनीला द्यावयाच्या नुकसानभरपाईच्या प्रश्ना-बद्दलहि लवकरच तडजोड होणार असल्याच्या वार्ता आहेत.

**आगीमुळें झालेलें प्रचंड नुकसान**—अमेरिकेमधील मिचि-गन मधील जनरल मोटार्स कंपनीच्या एका कारखान्याला गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्यें आग लागून तो जळून नष्ट झाला. कारखान्याचा विमा उतरलेला असल्यामुळें विमा-कंपन्यांना ३ कोटी डॉलर्स नुकसान-भरपाई द्यावी लागली. त्यापैकीं निम्म्या रकमेची तरतूद ब्रिटिश विमा-कंपन्यांना करावी लागली. आगी-मुळें द्याव्या लागलेल्या विम्याच्या रकमांत ही सर्वांत मोठी रक्कम आहे, असें समजतें.

**गोपीकृष्ण तलावाचें उद्घाटन**—उज्जैन जिल्ह्यांत तराणा गांवाजवळ एक छोटें धरण बांधण्यांत आलें आहे. ह्या धरणाचा उद्घाटन समारंभ मध्यभारताचे मुख्य-मंत्री श्री. गंगवाल ह्यांच्या हस्तें नुकताच करण्यांत आला. ह्या धरणाचें बांधकाम लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें केलें आहे. सरकारनें ३,००० रुपये दिले आणि लोकांनीं २,००० रुपये जमविले. धरणाच्या पाण्याखालीं ७५ एकर जमिन भिजणार आहे.

**काश्मीरमधील ग्रंथालय**—काश्मीरमधील सरकारी वाचना-लयाला भारतीय सरकारकडून आणि ब्रिटिश म्युझिअमकडून कांहीं प्राचीन हस्तलिखितें मिळालीं आहेत. काश्मीरच्या ग्रंथा-लयांत ७,००० दुर्मिळ ग्रंथ आणि १,४०० जुनीं हस्तलिखितें आहेत. हस्तलिखितें संस्कृत, पर्शिअन, अरेबिक, डोग्री, पंजाबी, हिंदी आणि काश्मीरी भाषेंतील आहेत.

**राजस्थानची पाटबंधाऱ्याची योजना**—राजस्थान सरकारनें भिलवाडी जिल्ह्यांत मानसी नदीवर एक धरण बांधण्याचें ठरविलें आहे. धरणासाठीं ३३,४३,००० रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. योजना पूर्ण झाल्यावर ज्या जमिनीला पूर्वी पाण्याची शाश्वति नव्हती अशा १९,५०० एकर जमिनीला पाणीपुरवठा होऊं लागेल.

**बनारस विद्यापीठाला देणगी**—रीवाच्या महाराजांनीं बनारस येथील 'गंगामहाल' राजवाडा बनारस विद्यापीठाला देणगीदाखल दिला आहे. ह्या राजवाड्याची किंमत सुमारें ३ लाख रुपये आहे. राजवाडा विद्यार्थ्यांचें वसतिगृह म्हणून वापरण्यांत यावा अशी इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली आहे. रीवा संस्थानांतील विद्यार्थ्यांना त्यांत प्रथम जागा देण्यांत यावी, अशी अट घालण्यांत आली आहे.

**आसाममधील शिक्षणाचा प्रसार**—आसाम राज्यांत चालू वर्षी बऱ्याच शैक्षणिक योजना अंमलांत आणल्या जात आहेत. ह्या योजनांवर ११ लाख रुपये खर्च होत आहे. त्यांतील कांहीं भाग राज्य-सरकार आणि कांहीं भाग भारतीय सरकार खर्च करीत आहे. अशाच एका योजनेंत ५०० शिक्षकांना नोकरी देण्यांत आली आहे. वाचनालयांच्या सुधारणेसाठीं १,००,००० खर्च करण्यांत येणार आहेत.

**अजमीर येथें औद्योगिक प्रदर्शन**—अजमीर येथें अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचें अधिवेशन भरलें त्यावेळीं तेथें अ. भारतीय विकास आणि औद्योगिक प्रदर्शनहि भरविण्यांत आलें. प्रदर्शनाचें उद्घाटन राजस्थानचे मुख्य मंत्री श्री. जयनारायण व्यास ह्यांनीं केलें. प्रदर्शन २० जुलैपासून १० ऑगस्टपर्यंत खुलें रहाणार आहे.

### अबू रोड भागांतील खनिज-संपत्ति

भारतीय सरकारच्या भूस्तरखात्यातर्फे अबू रोड भागांतील खनिज-संपत्तीची पहाणी नुकतीच करण्यांत आली. पहाणींत असें आढळून आलें कीं ह्या भागांत १·५ कोटी टन उत्तम प्रतीचा चुनखडीचा दगड आहे. हा भाग पूर्वी सिरोही आणि पालनपूर संस्थानांच्या हद्दींत अंशतः मोडत असे. आतां तो मुंबई राज्यांत समाविष्ट करण्यांत आलेला आहे. निरनिराळ्या भागांत सांपडणाऱ्या खनिजांचा शोध लावून त्यांचा कोणत्या उद्योगधंद्यासाठीं उपयोग होईल तें तपासून पहाण्यासाठीं वरील पहाणी करण्यांत आली होती. खनिजांचे जे निरनिराळे नमुने सांपडले त्यांचें पृथःकरण करण्यांत आलें. मवाई भागांतील चुनखडीचा दगड सोडून इतर ठिकाणचा चुनखडीचा दगड सिमेंटच्या अगर चुन्याच्या उत्पादनाला योग्य असल्याचें आढळून आलें. मरथाला, किवरली आणि आदत्रा भागांत सांपडणारी चुनखडी अतिशय चांगल्या प्रकारची असल्याचें दिसून आलें. औद्योगिक कारखान्यांतून अगर रासायनिक कारखान्यांतून ह्या चुनखडीचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे. अबू रोड, वनवान व पांडोरे ह्या भागांतील चुनखडी विशेषतः चुना तयार करण्यासाठीं उपयुक्त आहे चुन्याचा धंदा कोणत्या भागांत चांगला विकास पावूं शकेल ह्याचाहि आढावा घेण्यांत आला आहे. चुन्याला ह्या भागांत दरवर्षी जवळजवळ ४०,००० टनांची मागणी असते. रेल्वेकडूनच १,२५,००० टनांची वार्षिक मागणी येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. त्याशिवाय सिमेंटच्या कारखान्यासाठीं अगर कारखान्यांत लागणारा चुना बनविण्यासाठींहि ह्या दगडाचा उपयोग करतां येण्यासारखा आहे. भारतामधील अज्ञात खनिज-संपत्तीचा शोध लावण्याचें काम अलीकडे जोरानें चालू झालें आहे.

### आयुर्वेदीय अर्कशाला लिमिटेड, सातारा

अहवालाचे वर्षीं कंपनीनें १,१७,४८३ रु. ची विक्री करून ७१,२४८ रु. ठोक नफा मिळविला. सर्व खर्च भागवून व २,३२४ रु. घसारा काढून कंपनीस एकुण रुपये ४३२८–१३–११ इतका नफा झाला. त्यांतून मागील वर्षाचा तोटा रु. ४२६०–१३–८ वजा जातां रु. ६८–०–३ इतका नफा शिल्लक रहातो. सदर नफा पुढील वर्षाकरितां वर्ग केला आहे. चालू वर्षीं नफ्याचें प्रमाण जरी कमी असलें तरी कंपनीचें पाऊल प्रगतीच्याच मार्गानें चाललें आहे असें म्हणावयास कोणत्याहि तऱ्हेचा प्रत्यवाय नाहीं. मागील वर्षापेक्षा विक्रींत रु. ६,००० नीं वाढ झालेली आहे. मात्र खर्चाचे बाजूला त्यामानानें वाढ झालेली नाहीं. याचें कारण कंपनीनें गेलीं दोन वर्षें अवलंबिलेलें काटकसरीचें धोरण हेंच होय. आर्थिक टंचाईमुळें बाकी वसुलींत अडचणी उत्पन्न झाल्या त्यामुळें वेळोवेळीं हाताशीं लागणारी रक्कम मिळेनाशीं झाली. अशाहि परिस्थितींत कंपनीनें रु. ७,००० च्या ठेवी परत केल्या असून, इतर देणींहि, कंपनीचे गेले तीन वर्षांचे ताळेबंद लक्षांत घेतां, बरेंच कमी झाल्याचें दिसून येईल. ही सर्व प्रगति करीत असतांना आर्थिक मंदी व सरकारी बंधनें यामध्यें कोणत्याहि प्रकारचा बदल झालेला नाहीं. वरील सर्व गोष्टींवरून कंपनीचा पाया आर्थिकदृष्ट्या दिवसेंदिवस मजबूत होत असल्याचें दिसून येईल. कंपनीचें वसूल भांडवल १,१०,४०५ रु. असून तिचेकडे ७०,६१५ रु. च्या ठेवी आहेत. एकूण ताळेबंद २,००,८६० रुपयांचा आहे.


**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"


—मराठी दुसरी आवृत्ति—

८ जुलै रोजीं प्रसिद्ध झाली.

पृ. सं. १३८ ★ किंमत २॥ रु.

**किर्लोस्कर**

कॉटेज शेंगायंत्र



शेंगदाणे न फुटतां शेंग फोडली जाते. बी-बियाणासाठीं उपयुक्त. दरेक तासास ८० पौंड शेंग फोडली जाते.

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

**पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.** १२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

- शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
- शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारची खतें.
- सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
- बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अन्य कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
- गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
- वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.


फोन नं. ३२१५ तार-SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. २८ जुलै, १९५४


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंग्रजी–मराठी अर्थशास्त्र परिभाषा *

अहमदनगर कॉलेजांतील प्राध्यापक श्यामकान्त माधव कुलकर्णी ह्यांनीं " इंग्लिश–मराठी अर्थशास्त्र परिभाषा " हें पुस्तक तयार करून प्रसिद्ध केलें आहे. त्याच्या प्रकाशनाचा खर्च अहमदनगर कॉलेज, अहमदनगर, ह्या संस्थेनें दिला आहे ही विशेष उल्लेखनीय गोष्ट होय. प्राध्यापकवर्गानें लेखनकार्य व संशोधन करण्यास उत्तेजन मिळावें ह्यासाठीं त्यांना आर्थिक साहाय्य करण्याचें कॉलेजचें धोरण अनुकरणीय आहे.

मराठी माध्यमांतून अर्थशास्त्र शिकविण्यास प्रारंभ झाला म्हणजे मुख्य अडचण भासणार ती शब्दसंपत्तीची होय. शास्त्रीय विषयास अनुरूप असे योग्य व समर्पक शब्द शोधून काढले पाहिजेत व जरूर तर नवीन बनविले पाहिजेत आणि हे शब्द सर्वमान्य झाले पाहिजेत. ह्या दृष्टीनें प्रा. कुलकर्णी ह्यांच्या उपक्रमाचें आम्हीं स्वागत करतों. त्यांनीं प्रस्तावनेंत पारिभाषिक शब्दांच्या कांहीं कसोट्या सोदाहरण दिल्या आहेत आणि स्वाभाविकच त्यांना उतरण्याची त्यांनीं पराकाष्ठा केलेली आहे. त्यांनींच सुचविलेले शब्द सर्वांनीं मान्य केले पाहिजेत असा त्यांचा स्वतःचा दावा असणें शक्यहि नाहीं. डॉ. रघुवीर ह्यांच्या अर्थशास्त्र शब्दकोषांतील कांहीं शब्द प्रा. कुलकर्णी ह्यांनीं घेतलेले आहेत व इतरहि शब्दकोषांची मदत घेतलेली आहे. अशाच रीतीनें हळुहळु परिभाषा बनत व दृढमूल होत जाणार हें उघड आहे. त्यांच्या प्रस्तावनेंतील ह्याबाबत चर्चा येथें उद्धृत केली आहेतः—

" या विषयावर साधकबाधक चर्चा होणें अवश्य आहे. सांच्यांतून विटा काढल्याप्रमाणें ठोकळेबाज शब्द काढून परिभाषा संपन्न होत नाहीं. पारिभाषिक संज्ञा या समर्पक, प्रवाही व अर्थपूर्ण असल्या पाहिजेत. निर्जीव, खडबडीत व क्लिष्ट शब्दामुळें अर्थाऐवजीं अनर्थच उद्भवतो. शास्त्रीय वाङ्मय म्हणजे रुक्ष, रसहीन व निर्जीव चर्चा, असें समजण्याचें कारण नाहीं. इंग्रजी वाङ्मयांत अत्यंत अवघड विषयहि सुगम व मनोहारी शब्दांत सामान्य माणसाकरितां लिहिणाऱ्या जुलियन हक्स्ले, जेम्स् जीन्स, बर्ट्रँड् रसेल, आर्थर एडिंग्टन्, हॉगबेन् इत्यादि लेखकांनीं मौलिक भर टाकली आहे. शास्त्रिय वाङ्मय देखील ओघवती भाषेमुळें लोकप्रिय होऊं शकतें व सामान्य माणसांलाहि अवघड विषयांत आवड उत्पन्न होते.

"म्हणूनच निव्वळ शब्दकोशामुळें वाङ्मय समृद्ध होत नाहीं. वेचक शब्द व शब्दरचना, परिणामकारक वाक्यरचना, भाषाशैली, इत्यादिकांची शास्त्रीय वाङ्मयालाहि अत्यंत आवश्यकता असते. म्हणूनच योग्य पारिभाषिक शब्द निवडले गेले पाहिजेत, त्यांचा शास्त्रीय अर्थ निश्चित झाला पाहिजे व ते पूर्णपणें प्रचलित झाले पाहिजेत. लेखकागणिक वेगवेगळे शब्द वापरले गेल्यास परिभाषा स्वयंपूर्ण व अर्थवाही होणार नाहीं. विशेषतः सामाजिक शास्त्रांचा वर्ण्यविषय अत्यंत संमिश्र व चंचल असल्यामुळें इंग्रजीसारख्या समृद्ध भाषेंत देखील निव्वळ शाब्दिक वाद सारखे चालू असतात व अनेक वेळां शब्द अपुरे पडतात. त्या मानानें सर्वच भारतीय भाषांना अद्याप फारच प्रवास करावयाचा आहे. संस्कृत भाषा–संपत्तीची आपल्याला फार मदत होते, हें खरें; पण कांहीं झालें तरी संस्कृत ही प्राचीन भाषा आहे. आधुनिक शास्त्रांनीं त्यावर बरीच मजल मारली आहे, हें नाकारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हे सर्व विचार संस्कृत भाषेच्या साहाय्यानें तात्काळ आपल्या भाषेंत मांडतां येणें शक्य नाहीं. त्याकरितां नवी शब्दरचना करावी लागेल; नवी वाक्यरचना करावी लागेल; पेलतील असे परकी शब्ददेखील अस्पृश्य मानण्याचें कारण नाहीं. मात्र आपले प्रत्यय व परकी शब्द अशी धेडगुजरी रचना भाषेला हानिकारकच ठरेल.

"अर्थशास्त्राविषयींच विचार करावयाचा झाल्यास असें निश्चित लिहिलीं गेलीं आहेत त्यांमधून परिभाषा तयार करण्यावर फारसे प्रयत्न झाले आहेत. अर्थातच हें कार्य एकाद्या व्यक्तीनें बसल्या बैठकींवर करून टाकण्यासारखें नाहीं, हें खरें. आवश्यक ते पारिभाषिक शब्द तयार करून त्यावर निरनिराळ्या तज्ज्ञ व्यक्तींनीं सांगोपांग चर्चा करावी व परिभाषा निश्चित करावी. याचा असा अर्थ मात्र नव्हे कीं, परिभाषेनें भाषा जखडून टाकावी, किंवा ती लवचिक नसावी. याचा अर्थ इतकाच कीं, एकच शब्द वेगवेगळ्या अर्थी किंवा एकाच अर्थी वेगवेगळे शब्द वापरल्यानें जी अनिश्चितता निर्माण होते, ती नाहींशी करणें अवश्य आहे. तसेंच शब्दकोशांतून उचलून ते वापरूं लागल्यास भाषा बोजड व निर्जीव होईल. याचें उत्तम उदाहरणच हवें असल्यास डॉ. रघुवीर यांचा 'अर्थशास्त्र–शब्द–कोश' उघडून पहावा. " A rise in price is usually accompanied by a fall in demand, and a fall in price by a rise in demand," हेंच वाक्य रघुवीरांच्या शब्दकोषीय शब्दांत पुढीलप्रमाणें करावें लागेल. " मूल्याच्या उद्रोहामुळें सामान्यतः अभियाचनपात होतो, व मूल्यपातामुळें अभियाचन–उद्रोह होतो." ठोकळेबाज शब्द-रचना यंत्रांतील काव्यासारखीच होणार ! अशीं शेकडों उदाहरणें दाखवितां येतील. "

* लेखक व प्रकाशक : प्रा. श्या. मा. कुलकर्णी, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर. पृ. सं. ५७ किं. १ रुपया.

---

**काश्मीरमधील रम्यस्थळें**—काश्मीरमधील निरनिराळीं सौंदर्यस्थळें प्रवाशांना पहाण्यासाठीं सुलभ व्हावीं म्हणून त्यांना जाणारे मार्ग मुख्य रस्त्यांना जोडण्याचा विचार काश्मीरचें सरकार करीत आहे. काश्मीरमध्यें केवळ रस्ते नसल्यामुळें दुर्गम्य अशीं असणारीं बरींच रम्य ठिकाणें आहेत. त्यांचाहि विकास करण्याचा सरकारचा बेत आहे.

## भारतांत रशियन तज्ज्ञ येणार

भारताला तांत्रिक सल्ला देण्यासाठीं कांहीं रशियन तज्ज्ञ येणार असल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. भारत आणि रशिआ हे दोन्हीं प्रधानतः शेतीप्रधान देश असल्यानें ह्या वृत्ताला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. शिवाय भारताचा पंचवार्षिक कार्यक्रम कांहीं प्रमाणांत रशिआच्या पंचवार्षिक कार्यक्रमासारखा असल्यानें रशियन तंत्रज्ञांचा सल्ला भारताला मोलाचा ठरण्याचा संभव आहे. रशिआंत नवीन सामाजिक व आर्थिक घडी बसविण्यासाठीं जे प्रयोग करण्यांत आले त्यांच्या संबंधीं बरीच टीका करण्यांत आली आहे. तथापि रशिआनें आपल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या जोरावर शेतकी आणि उद्योगधंदे ह्या दोन्ही क्षेत्रांत खूपच प्रगति केली आहे ह्यांत शंका नाहीं. अणुशक्तीचा उपयोग करून वीज निर्माण करणारें जगांतील पहिलें केंद्र रशिआनें उभारलें हें लक्षांत घेतां रशियन शास्त्रज्ञांचा आणि तंत्रज्ञांचा अव्वल दर्जा उघडच होतो. रशिआंतील शास्त्रज्ञांना भारतांत आणण्याची आणि भारतीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठीं रशिआंत पाठविण्याची जी व्यवस्था प्रा. महालनवीस ह्यांनीं तयार केली आहे, ती भारताच्या ह्या बाबतींत इतर देशांशीं होणाऱ्या व्यवहारांतलीच एक पायरी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. शेतीच्या बाबतींत रशिआंतील अनुभव आणि तंत्र भारताला अधिक उपयुक्त ठरण्याचा संभव आहे. रशिआनें १२ अश्वशक्तीचे यंत्रचालित नांगर भारताला देण्याचें कबूल केलें आहे. भारतामधील शेती लहान प्रमाणावर चालणारी असल्यामुळें ह्या नांगरांचा उपयोग कसा काय होतो तें पहाण्यासाठीं सरकारच्या अन्नखात्यानें प्रथम चारच नांगर विकत घेण्याचें ठरविलें आहे. आपल्याकडील शेतें लहान असल्यामुळें यंत्रचलित नांगरांचा पूर्ण उपयोग करणें अवघड जातें. अशा परिस्थितींत ह्यासंबंधीं दक्षता बाळगली जाणें युक्तच आहे.

---

## जर्मनींत कृत्रिम रबराचें उत्पादन

प. जर्मनींतील कांहीं कारखानदारांनीं कृत्रिम रबराचें उत्पादन करण्याचा एक कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्यांत दर वर्षी ३०,००० टन कृत्रिम रबर निर्माण करण्याचा त्यांचा विचार आहे. सर्वच कारखानदार ह्या धंद्यांत काम करीत असून नवीन कारखान्यासाठीं लागणारें भांडवल त्यांनीं आपल्या सध्याच्या विक्रीवर एक टक्का अधिक किंमत घेऊन उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या पद्धतीनें दरवर्षी १,५०,००,००० मार्क भांडवल उभें राहील असा अंदाज करण्यांत आला आहे. कारखान्यास लागणारा कच्चा माल म्हणून क्रूड ऑइल वापरण्यांत आल्यास भांडवल म्हणून १६,४०,००,००० मार्कांची रकम उभी करावी लागेल. पण तेलाऐवजीं 'ब्युटेन' नांवाचा वायुमय पदार्थ कच्चा माल म्हणून अमेरिकेंतून आयात करण्यांत आल्यास भांडवल म्हणून १३,००,००,००० मार्क पुरे होतील. एक किलोग्रॅम ब्यूना कृत्रिम रबर उत्पादन करण्यास २.९५ मार्क खर्च येईल. ह्याच तऱ्हेचें रबर अमेरिकेंतून आयात करण्यांत आल्यास त्याची किंमत जर्मन बनावटीच्या रबरापेक्षा कमी असेल म्हणून ह्या धंद्याला जर्मन सरकारची मदत पहिल्यापासूनच लागेल. गेल्या महायुद्धांत जर्मनीनें हा धंदा मोठ्या प्रमाणावर वाढविला होता. परंतु नंतर व्यापी राष्ट्रांच्या फौजांनीं ह्या धंद्यांवर कडक बंधनें घातलीं. प. जर्मनींत हीं बंधनें आतां रद्द करण्यांत आलीं असल्यानें जर्मन भांडवलदार ह्या धंद्याचें मोठ्या प्रमाणावर पुनरुज्जीवन करण्याच्या योजना आंखीत आहेत. फ्रान्समध्यें स्वस्त दराची दारू इतकी होते कीं ती खपवितां येत नाहीं. ह्या दारूचा उपयोग कृत्रिम रबरासाठीं कच्चा माल म्हणून करण्याचें घाटत होतें. परंतु अलीकडे ह्या कल्पनेविषयीं कोठें फारसें बोललें जात नाहीं. त्यावरून जर्मनीला अधिक कच्चा माल मिळण्याची शक्यता वाटत आहे असें समजण्यांत येत आहे.

---

## भारतामधील अशुद्ध लोखंडाचा सांठा

भारताच्या जिऑलॉजिकल सर्व्हेतर्फे डायरेक्टर डॉ. कृष्णन् ह्यांनीं एक माहितीपत्रिका प्रसिद्ध केली आहे. ह्या पत्रिकेंत असें म्हटलें आहे कीं, भारतामधील अशुद्ध लोखंडाचा सांठा इतका आहे कीं त्याचा उपयोग करून लोखंडाचा व पोलादाचा धंदा समाधानकारक रीतीनें काढता येईल. लोखंडाशिवाय कोकिंग कोळ व पोलादाच्या निर्मितीसाठीं लागणारीं खनिजें ह्यांचाहि पुरवठा भरपूर प्रमाणांत होण्यासारखा आहे. बिहार, ओरिसा, मध्य-प्रदेश, म्हैसूर, मद्रास, मुंबई आणि राजस्थान ह्या राज्यांतून जरूर त्या खनिजांचे सांठे आहेत. निकेलसारखीं कांहीं खनिजें भारतांत पुरेशी नाहींत हें खरें आहे; पण त्याबद्दल विशेष अडचण वाटण्याचें कारण नाहीं. कारण, पोलादाच्या निर्मितीसाठीं जीं इतर खनिजें लागतात तीं सर्वच्या सर्व कोठल्याहि एकाच देशांत क्वचितच सांपडलेली नाहींत. येत्या २०-२५ वर्षांत पोलादाचा धंदा भारतानें वाढवावयाचें ठरविलें तरी सुद्धां पुरेसें अशुद्ध लोखंड भारतांत मिळूं शकेल. त्याचा उपयोग करून दरवर्षी दीड ते दोन कोटी रु. च्या पोलादाची निर्मिति करण्याइतकी मजल भारत गाठूं शकेल. सध्यां भारतांत दरवर्षी सुमारें १२ लाख टन पोलाद निर्माण होतें. देशांतील पोलादाची मागणी मात्र २० लाख टनांच्याही पेक्षा अधिक आहे. १९५६ अखेर भारतामधील पोलादाचें उत्पादन ३,००,००० टनांनीं वाढविण्याचा पोलादाच्या कारखान्यांचा बेत आहे. नियोजन-समितीनें दरवर्षी ४,००,००० टन बिहारच्या लोखंडाचें उत्पादन करण्यांत यावें अशी शिफारस केली आहे. खाणींमधील कामें करण्यांत यंत्राचा उपयोग हल्लींपेक्षा अधिक करतां येण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें खाणींतील वहातुकीची व्यवस्थाहि अधिक सुधारतां येण्यासारखी आहे असेंहि माहितीपत्रकांत नमूद करण्यांत आलें आहे.

---

## खेळत्या चलनी नोटांत वेगवेगळ्या नोटांचें प्रमाण

एकूण चलनी नोटांत वेगवेगळ्या नोटांचें प्रमाण काय आहे, ह्याचे आंकडे खालीं दिले आहेत. १ रु. च्या नोटांना कायद्यानें रुपयाच समजलेले असल्यानें, त्यांचा समावेश चलनी नोटांत केला जात नाहीं. एकूण ११४८ कोटी रुपये किंमतीच्या नोटांत १९५३ अखेर, ४९४ कोटी रुपयांच्या नोटा प्रत्येकीं १०० रुपयांच्या होत्या व त्या खालोखाल ४८४ कोटी रुपयांच्या नोटा प्रत्येकी १० रुपयांच्या होत्या. एकूण १४५ कोटी रुपयांच्या ५ रुपयेवाल्या नोटा व्यवहारांत होत्या, तर २ रुपयेवाल्या नोटांची रकम फक्त २५ लक्ष रु. भरली.

| प्रत्येकीं नोटेची किंमत | एकूण चलनी नोटांच्या रकमेशीं प्रमाण% |
|---|---|
| २ रु. | २.२ |
| ५ रु. | १२.६ |
| १० रु. | ४२.२ |
| १०० रु. | ४३.० |

## पेट्रोलियमच्या पदार्थांचें उत्पादन

### भारतांतील तेल विहिरी व तेलशुद्धीचे कारखाने

ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें दरसाल ७ कोटी मेट्रिक टन पेट्रोलियमचे पदार्थ खपतात. पण, १९५३ सालीं फक्त २ कोटी मेट्रिक टन इतकेंच क्रूड ऑइल कॉमनवेल्थमध्यें निघालें. मुख्यतः कॅनडा, ब्रिटिश बोर्निओ व त्रिनिदाद ह्यांतच त्याचें उत्पादन होतें. जागतिक उत्पादन ६७·५ कोटी मेट्रिक टन आहे. म्हणजे त्याच्या फक्त ३% इतकेंच उत्पादन ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें होतें. तेल उत्पादक राष्ट्रांत अमेरिका अग्रेसर आहे.

**ब्रिटिश कॉमनवेल्थमधील तेलाचें उत्पादन**

हजार मेट्रिक टन क्रूड ऑइल

| देश | १९३८ | १९५२ | १९५३ |
|---|---|---|---|
| कॅनडा | ९०० | ८,२६५ | ११,३०० |
| ब्रिटिश बोर्निओ | ९०० | ५,१३० | ५,१०० |
| त्रिनिदाद | २,६०० | ३ ०७६ | ३ २०० |
| भारत | ) ४०० | २५८ | २७० |
| पाकिस्तान | ) | १७९ | १८५ |
| ग्रेटब्रिटन | — | ५५ | ५५ |
| इतर | १,१०० | — | — |
| एकूण | ५,९०० | १६,९६३ | २०,११० |

ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें जागतिक उत्पादनाच्या मानानें इतकें कमी उत्पादन होतें आणि त्यांतील भारताचा वाटा अत्यल्प म्हणजे १·३५% इतकाच आहे. जागतिक उत्पादनाच्या मानानें भारतांतील उत्पादन ·०४% इतकें सुद्धा नाहीं. उत्तर आसाम आणि पंजाब येथें कित्येक वर्षे तेलाचें लहान प्रमाणावर उत्पादन चालू आहे. १९४७ मध्यें आसामचें तेल भारताच्या वाट्यास आलें व पंजाबमधील तेल पाकिस्तानला मिळालें. आसामांत दिगबोई येथें तेल सापडतें. १८६७ मध्यें आसामांत तेलाच्या विहिरी खणण्यास प्रारंभ झाला, परंतु तो व त्यानंतरचेहि कित्येक प्रयत्न अयशस्वी ठरले. अखेर, १८९० मध्यें दिगबोईच्या तेलाच्या विहिरी यशस्वी झाल्या. १९१६ मध्यें आणखीहि एके ठिकाणीं तेल आढळलें, पण भारताचें सर्व उत्पादन सध्यां दिगबोई येथेंच होतें. तेलाचा इतरत्र शोध मात्र चालू आहे.

भारतांत मुंबई शेजारीं ट्रॉम्बे बेटांत तेल शुद्धीचे दोन कारखाने उभारण्यांत येत आहेत. त्या दोन्हींत मिळून दरसाल ३२·५ लक्ष टन तेल शुद्ध होऊं शकेल. त्यांपैकीं बर्मा शेलच्या कारखान्याची उत्पादनक्षमता २० लक्ष टनांची आहे व स्टँडर्ड व्हॅक्युम ऑईल कंपनी उभारीत असलेला तेल शुद्धीचा कारखाना १२ लक्ष टन तेल शुद्ध करील. काल्टेक्स कंपनी विशाखापट्टम् येथें ५ लक्ष टनांचा एक कारखाना उभारीत आहे.

**मुंबई राज्यांत रेयॉनचा कारखाना**—मुंबई सरकार आपल्या राज्यांत रेयॉनचा कारखाना काढण्याचा विचार करीत आहे असें समजतें. राज्य-सरकारच्या उद्योग-खात्यातर्फे फिनलंडमधील एका कंपनीशीं ह्या बाबतींत वाटाघाटी चालू आहेत. दिल्ली येथील फिनलंडच्या व्यापारी प्रतिनिधींमार्फत हीं बोलणीं चालू आहेत.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई.
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,३००
ठेवी .... .... .... रु. १,१८,५८,४००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,३३,९००
शाखा:- दादर, माहीम — बँकेचे सर्व व्यवहार केले जातात — शाखा:- बेळगांव, पुणें

स्थापना १९१८

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा:
ब्रँच सेक्रेटरी.

WILICO
कालाबरोबरच प्रगतिपथावर
वेस्टर्न इंडियानें
आपली तेजस्वी परंपरा १९५३ सालींही पूर्णत्वानें राखिली आहे.
१९५३ चे यशस्वी आंकडे
एकूण नवीन काम ... रु. २३/४ कोटींवर
एकूण चालू काम ... रु. १९ कोटींवर
एकूण हप्त्यांची आवक ... रु. ९४ लाखांवर
एकूण आयुर्निधि ... रु. ६ कोटींवर
एकूण व्हॅल्यूस ... रु. २३/४ कोटींवर
★ १९५३ अखेरच्या मूल्यमापनाचें काम चालू आहे. आपल्या पसंतीची एखादी उत्कृष्ट योजनेखालील वेस्टर्न इंडियाची कमी केलेल्या दरांत पॉलिसी घ्या.
सविस्तर माहितीसाठीं आपल्या जवळच्या शाखा कार्यालयास लिहा अथवा भेटा.
वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा
शाखा कार्यालय:—वेस्टर्न इंडिया हौस, लक्ष्मी रस्ता, पुणें २

# मुंबई राज्यांतील नियंत्रणाचा आढावा

२ मे १९४३ आणि ३० मे १९५४ हे दोन दिवस मुंबई राज्यांतील जनतेच्या स्मरणांतून कित्येक दिवस जाणार नाहींत आणि खरोखर ते दिवस तसेच महत्त्वाचे आहेत. २ मे १९४३ या दिवशीं मुंबईंत रेशनिंग सुरू झालें आणि ३० मे १९५४ मध्यें ते व्यवहारतः संपलें. म्हणजे या दोन तारखांमध्यें ११ वर्षांहून अधिक काळ गेला. या काळाचें आपण विहंगावलोकन केलें तर तें जितकें मनोरंजक तितकेंच उद्बोधक होईल.

## रेशनिंगची जन्मकथा

"आज आपण नियंत्रणाच्या काळांतून बाहेर पडून निर्नियंत्रणाच्या वातावरणांत जवळजवळ स्वैरपणें वावरत आहोंत, असें म्हणायला हरकत नाहीं. गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत, वृद्धांपासून अगदीं लहान मुलांपर्यंत सर्वांना, शेतकरीवर्ग, कामगारवर्ग, मध्यमवर्ग वगैरे सर्वांना नियंत्रणें उठल्यामुळें आज आनंद झालेला दिसत आहे. तथापि एक काळ असा होता, कीं नियंत्रणामुळें आपल्या देशाचा फायदा झाला होता, या गोष्टीचाहि आपण विसर पडूं देतां कामा नये. ११ वर्षांपूर्वी रेशनिंग म्हणजे काय हें भारतांतील लोकांना माहीत नव्हतें. समान वाटपाचें तत्त्व लोकांना अज्ञात होतें. कांहीं थोड्या लोकांकडे त्यांच्या गरजांच्या मानानें अधिक सांठा असल्यास तो काढून घेऊन सर्वांना सारख्या प्रमाणांत वाटून देण्याच्या तत्त्वज्ञानास तर लोक अगदींच अनभिज्ञ होते. कांहींसें याच कारणामुळें सुरवातीस रेशनिंगच्या तत्त्वास समंजस समजल्या जाणाऱ्या जाणत्यांकडूनाहि विरोध झाला. या दृष्टीनें रेशनिंग कां सुरू करण्यांत आलें, त्यावेळीं त्याला कारणें काय झालीं, हें पाहणें जरूर आहे. त्यावेळीं लढाई सुरू झाली होती आणि भारताला त्याच्या इच्छेविरुद्ध त्यावेळच्या परकीय सरकारनें त्यांत गोवलें होतें. माणसें व उत्पादनाचीं सर्व साधनें हीं रणदेवतेचीं आराधना करण्याच्या कामीं जुंपण्यांत आलीं होतीं. त्यामुळें आपल्याला दैनंदिन जीवनास लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तुहि मिळणें कठीण होऊं लागलें. घासलेटच्या एकएका बाटलीसाठीं किंवा ज्वारीच्या एक शेर दाण्यासाठीं किंवा मांजरपाटाच्या एक वार कपड्यासाठीं गरीब बायाबापड्या व छबकडीं उन्हातान्हांतून व वाऱ्यापावसांतून दुकानासमोर रांगा लावून बसूं लागलीं. या परिस्थितीचा समाजद्रोही लोकांनींहि फायदा घेतला. वस्तूंचे भाव भरमसाठ वाढूं लागले व सांठेबाजी सुरू झाली. असलेल्या वस्तुहि भरमसाठ मोल दिल्याखेरीज मिळेनाशा झाल्या. हीच परिस्थिति चालू राहिली असती तर दंगेधोपे सुरू होण्यास वेळ लागला नसता. तेव्हां परिस्थिति कह्यांत ठेवण्याकरितां असलेल्या वस्तू — समप्रमाणांत वांटून देणें हाच मार्ग शिल्लक होता. तो अवलंबिण्यांत आला आणि अशा रीतीनें रेशनिंगचा जन्म झाला.

"रेशनिंगची ही जन्मकथा दुसऱ्याहि एका दृष्टीनें अर्थपूर्ण आहे. लढाईनंतरच्या काळांत सामाजिक समतेच्या तत्त्वाची जी लाट जगावर पसरली तिची "रेशनिंग" ही एक प्रकारें नांदीच होती, असें म्हटलें तर तें फारसें चूक होईल असें वाटत नाहीं. रेशनिंग ११ वर्षांपूर्वी झालें आणि आज व्यवहारांतून तें गेलेंहि आहे. परंतु रेशनिंग सुरू करण्यामागें जें तत्त्व अनुस्युत होतें, तें तत्त्व कायमच आहे; नव्हे तें अधिकच प्रकर्षानें तळपत आहे. तें तत्त्व हेंच कीं, जगांतील व्यक्तीव्यक्तींमधील विषमता शक्यतोंवर सामाजिक उत्पात होऊं न देतां दूर करावयाची.

## रेशनिंगचा अवाढव्य व्याप

"१९४३ सालीं बृहन्मुंबईंत रेशनिंग सुरू झालें, त्या वर्षी सुमारें १६ ते १८ लाख लोकांना रेशनिंग लागू झालें होतें. पुढील सालीं हा आंकडा २५ ते २८ लक्षांच्या घरांत गेला व पुढें ४६, ४७ व ४८ सालीं तर तो ३५ लक्षांवर गेला. १९४९ मध्यें तो ३९ लक्षांपर्यंत गेला. जिल्ह्यांसंबंधीं बोलावयाचें झाल्यास १९४३ सालीं मुंबई राज्यांत मुंबई सोडून अवघ्या पांच शहरांत रेशनिंग होतें. पुढें रेशनिंगचा फायदा मिळणाऱ्या गांवांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. ५०, ५१ व ५२ सालीं रेशनिंगचा फायदा मिळणाऱ्या गांवांचा आंकडा १५० व लोकसंख्या ६० लक्षांपर्यंत गेली. म्हणजे, मुंबई राज्यांत एक वेळ अशी होती कीं, सुमारें १ कोटी लोकांना सरकारकडून ठराविक दरानें धान्यवांटप केलें जात असे आणि तेंहि कोणत्याहि प्रकारचा गाजावाजा न करतां.

"अशा प्रकारें नियंत्रणाचा फायदा जनतेस मिळाला परंतु देशाची धान्यटंचाई आणि त्यामुळें निर्माण होत असलेली इतर जीवनावश्यक वस्तूंची टंचाई आतां दूर झाल्यासारखीच आहे. देशांतल्या देशांतच हवें तितकें धान्य उपलब्ध होईल व त्यामुळें सांठेबाजीस वाव राहणार नाहीं अशी मुंबई सरकारची खात्री झाली, तेव्हांच मुंबई सरकारनें निर्नियंत्रणाच्या दिशेनें पावलें टाकण्यास सुरुवात केली. सबंध भारतांत एक त्रावणकोर—कोचीन राज्य सोडलें तर मुंबई राज्याइतकें अन्नधान्याच्या बाबतींत तुटवडा असलेलें राज्य दुसरें कोणतेंहि नाहीं. त्यामुळें आपल्या राज्याला फार जपून व सावधगिरीनें पावलें टाकावीं लागलीं. निर्नियंत्रणाचा पहिला मोठा प्रयोग १९५२ सालीं मद्रास राज्यांत सुरू झाला. मुंबई सरकारनें या प्रयोगाकडे फार काळजीपूर्वक लक्ष दिलें. हा प्रयोग यशस्वी होण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यावर मग मुंबई सरकारनें हालचाल सुरू केली. त्यानें धिमेपणानें पण निश्चयानें निर्नियंत्रणाच्या दिशेनें पावलें टाकावयास सुरुवात केली. नियंत्रणाची मशाल मोठ्या शहरांपासून सुरू होऊन अगदीं शेवटीं ती खेडेवजा शहरांपर्यंत पोहोंचली होती. निर्नियंत्रणाचीं पावलें टाकतांना अर्थातच हा क्रम बदलून तो उलटा करावा लागला. १९५३ सालीं मुंबई सरकारनें शहरवजा खेडेगांवांमधील नियंत्रणें उठविण्यास सुरुवात करून १९५४ च्या मध्यापर्यंत मुंबईसकट सर्व शहरांतील बहुतेक सर्व नियंत्रणें व्यवहारतः उठविलीं.

## बेकारांचा प्रश्न

"सुमारें १५,००० लोकांच्या चरितार्थाचें साधन नागरी पुरवठा खातें (रेशनिंग खातें) होतें. तें बंद झाल्यावर जनतेची सेवा केलेल्या या नोकरवर्गापैकीं जे पात्र होते त्यांची शक्य तितकी तरतूद करणें हें सरकारचें कर्तव्य होतें व सरकारनें त्याप्रमाणें या खात्यांतील बेकार नोकरांना इतर खात्यांतून सामावून घेतले जावे, म्हणून जरूर ते हुकूम काढले. इतर खात्यांतून तीन वर्षांहून कमी नोकरी झालेल्या तात्पुरत्या लोकांना काढून टाकून कां होईना, पण नागरी पुरवठा खात्यामार्फत सीनिअर लोकांना घ्या, असाहि आदेश देण्यास सरकारनें कुचराई केली नाहीं. परंतु सरकारकडेच सर्व लोकांना सामावून घेण्याइतका वाव नसल्यामुळें अद्याप बहुसंख्य लोक बेकार आहेत, ही गोष्ट दुर्दैवानें खरी आहे.

## जनतेस धन्यवाद

"मुंबई राज्यांतील नियंत्रण व निम—नियंत्रण काळांतील कारभारविषयक जमाना एकंदरीनें पाहतां या राज्याच्या कीर्तीस

साजेशा रीतीनें यशस्वी झाला असें म्हणतां येईल. याबद्दल जनता जितकी धन्यवादास पात्र आहे, तितकीच हा कारभाराचा गाडा हाकणारी यंत्रणा म्हणजे सरकारी नोकरवर्ग धन्यवादास पात्र आहेत. त्याचप्रमाणें मध्यवर्ती सरकारकडून आपल्या राज्यास जी वेळोवेळीं मदत झाली, नियंत्रणाची बजावणी करण्याच्या व ती उठविण्याच्या कामीं त्या सरकारनें जी सक्रीय सहानुभूति दाखविली तिचाहि कृतज्ञापूर्वक उल्लेख केला पाहिजे.

"येत्या सुगीच्या हंगामापर्यंत उरलीं सुरलीं किरकोळ नियंत्रणेंहि उठतील व "नियंत्रण" हा शब्द लवकरच इतिहासजमा होईल, अशी साधार आशा वाटते. निर्नियंत्रणाची ही आनंददायी परिस्थिति प्राप्त होण्यास आपल्या जनतेनें केलेलें अमाप कष्ट हेच कारणीभूत आहेत आणि त्याबद्दल तिला द्यावे तितके धन्यवाद थोडेच होतील. १९४७ सालीं भारत स्वतंत्र झाल्यावर त्यानें प्रगतीच्या रोखानें घोडदौड करण्याचा निश्चय केला. अन्नधान्याचे बाबतींत आपण अल्पावधींत स्वयंपूर्ण होण्याची प्रतिज्ञा केली आणि त्याप्रमाणें पहिली पंचवार्षिक योजना आंखून शेती सुधारणेवर व छोट्या पाटबंधाऱ्यांवर भर देण्यांत आला. जनतेनें, कोट्यावधी शेतकऱ्यांनीं, लक्षावधी कामगारांनीं आपला हातभार लावला. स्वतःच्या हिंमतीवर व प्रसंगीं सरकारकडून मदत घेऊन शेतकऱ्यांनीं पाणीपुरवठा वाढविला, चांगलें बियाणें वापरलें, खतें वापरलीं व अधिक कष्ट करून आपल्या कोडो हातांनीं भारताच्या स्वयंपूर्णतेची पालखी उचलली. कामगारवर्गानेंहि कारखान्यांत व अन्यत्र उत्पादन वाढवून आपल्याकडून हातभार लावला. पंचवार्षिक योजना पुरी होण्याच्या आंतच शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या या कष्टाचा संकलित परिणाम इतका झाला कीं, भारताचीं धान्यकोठारें भरून गेलीं, आणि नियंत्रणाच्या शृंखला आपोआप तुटून पडल्या. आज आपण ज्या झपाट्यानें देशाची प्रगति करीत आहोंत, त्यामुळें आपल्या मायभूमीस लवकरच पूर्वीचे वैभवाचे दिवस प्राप्त होणार हें निश्चित आणि त्या दृष्टीनें जनतेच्या कष्टपूर्वक प्रयत्नांमुळें साध्य झालेलें निर्नियंत्रण हें आगामी वैभवाचा उषःकाल आहे, असेंहि म्हणतां येईल."—मुंबईचे नागरी पुरवठा खात्याचे मंत्री, श्री. यशवंतराव चव्हाण, ह्यांचें भाषण.

**श्रॉफ कमिटीच्या शिफारसीची अंमलबजावणी**

## सिंडिकेटच्या स्थापनेची पूर्वतयारी

### कमिटीची नेमणूक

औद्योगिक कंपन्यांचे भाग व डिबेंचर्स अंडरराइट करण्यासाठी प्रमुख बँकांनीं विमा कंपन्यांच्या सहकार्यानें एक सिंडिकेट स्थापावी, म्हणजे दीर्घ मुदतीच्या औद्योगिक कर्जपुरवठ्याचे कामीं त्यांचा अप्रत्यक्ष हातभार लागेल, अशी शिफारस श्रॉफ कमिटीनें केलेली आहे. भारतांतील सर्वांत मोठ्या व्यापारी बँकेच्या म्हणजे इंपीरिअल बँकेच्या नेतृत्वाखाली सिंडिकेटचें काम चालावें असेंहि कमिटीनें सुचविलें आहे.

ह्या शिफारसीच्या अंमलबजावणीबाबत तपशीलवार योजना आखण्याचें काम रिझर्व्ह बँकेनें एका कमिटीकडे सोपविलें आहे. त्यांत खालील तज्ज्ञ आहेत:—

१ मॅनेजिंग डायरेक्टर, इंपीरिअल बँक ( चेअरमन )
२ मॅनेजिंग डायरेक्टर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया
३ जनरल मॅनेजर, बँक ऑफ इंडिया
४ मॅनेजर, ओरिएंटल विमा कंपनी
५ जनरल मॅनेजर, न्यू इंडिया विमा कंपनी

**राष्ट्रीय योजना कर्जांत सहकारी संस्थांनीं एक कोटी रुपये भरले**

मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांनीं राष्ट्रीय योजना कर्जांत आतांपर्यंत एक कोटी रुपयांचा भरणा केला आहे.

सहकारी संस्थांनीं आपल्या राखीव निधींपैकी १० टक्के भाग राष्ट्रीय योजना कर्जास द्यावा, असा अलिकडेच सरकारनें त्यांना सल्ला दिला होता.

**पुणें जिल्ह्यांत औद्योगिक सहकारी संघाची स्थापना होणार**

पुणें जिल्ह्यांत औद्योगिक सहकारी संघाच्या प्रतिनिधींची सभा गुरुवार ता. १५ जुलै १९५४ रोजीं सहकारी खात्याचे जॉइंट रजिस्ट्रार श्री. व्ही. सुब्रह्मण्यम् ह्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडून त्या ठिकाणीं जिल्ह्याचा एक औद्योगिक सहकारी संघ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यांत आला. ह्यावेळीं पुणें जिल्ह्याचे असिटंट रजिस्ट्रार श्री. बी. एस. प्रयाग ह्यांनीं असें सांगितलें कीं, पुणें जिल्ह्यांत ५० औद्योगिक संघ सध्यां असून त्यांचे एकूण २८६३ सभासद, १,१०,९५८ रु. शेअर कॅपिटल, २,५०,०५९ रु. चें खेळतें भांडवल, व ५,६५,९६९ रु. चा एकंदर व्यवहार असें स्वरूप आहे.

या सभेंत औद्योगिक सहकारी संघाच्या अडि-अडचणींचा विचार-विनिमय करण्यांत येऊन हातमागाची योजना व पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रम पार पाडण्याच्या दृष्टीनें ह्या सहकारी संस्था कार्यक्षम कशा होतील त्यासंबंधीं विचारविनिमय करण्यांत आला.

**गंगापूर धरणाच्या कामाची प्रगति**

नासिक जिल्ह्यांत नासिक शहरापासून सुमारें ८ मैलांवर असलेल्या गंगापूर येथील मुख्य धरणाचें काम संपलें असून आतां फक्त सफाईचा हात देण्याचें काम ( फिनिशिंग ) शिल्लक राहिलें आहे व तें ऑक्टोबर १९५४ नंतर हातीं घेतलें जाईल. अखिल भारतांत मातीचें हें पहिलेंच धरण असून या धरणावर एकूण २५० लाख रु. खर्च होणार आहेत. आतांपर्यंत २४० लाख रु. खर्च झाला आहे. या धरणाची लांबी १,२८० फूट व उंची १२३ फूट नदी तळापासून असून धरणांत ५५० कोटी घनफूट इतकें पाणी सांठविलें जाणार आहे. नासिक आणि नगर जिल्ह्यांतील सुमारें ४५,००० एकर जमिनीला पाण्याचा उपयोग होईल. या पाण्यापैकीं ६० टक्के पाणी नासिक जिल्ह्याला व ४० टक्के पाणी नगर जिल्ह्याला देण्यांत येणार आहे. या पाण्यावर अंदाजें १५,००० टन अन्नधान्य व फळफळावळ आणि भाजीपाला असें उत्पादन होऊं शकेल.

**पं. नेहरूंना बँक-नोकरांचीं ५,००० कार्डें**

बँक अवार्ड जसाच्या तसा अंमलांत आणावा, नोकरवर्गास सध्यां मिळत असलेले पगार-भत्ते व सवलती ह्यांत कपात केली जाऊं नये, अशी विनंति करणारीं ५,००० पोस्टकार्डें मुंबईमधील बँक-नोकरांनीं पं. नेहरूंना पाठविलीं आहेत. प्रत्येक नोकरानें स्वतंत्र कार्ड लिहिलें आहे.

**कांच तयार करण्यासाठीं वाळू**—मद्रास राज्यांतील एनोर ह्या ठिकाणीं आणि त्रावणकोर-कोचीनमधील शेरतलाय ह्या ठिकाणीं कांच तयार करण्यास उपयुक्त असणारी वाळू मोठ्या प्रमाणावर सांपडली आहे. पहिल्या ठिकाणची वाळू फिकट पिवळ्या रंगाची आहे व दुसऱ्या ठिकाणची पांढऱ्या रंगाची आहे.

## साखरेचें जागतिक उत्पादन

(आंकडे हजार टनांचे)

| | १९३७ ते ३८ | १९५१ ते ५२ | १९५२ ते ५३ | १९५३ ते ५४ |
|---|---|---|---|---|
| **बीटाची साखर** | | | | |
| यु. एस. एस. आर. | २,५०० | २,५६० | ३,७०० | २,९५० |
| फ्रान्स | ९६९ | १,२३२ | ९८३ | १,६१३ |
| यु. स्टेट्स | १,२३२ | १,३८३ | १,३४६ | १,४७५ |
| प. जर्मनी | ... | १,४०५ | ८८४ | १,४१० |
| पोलंड | ५६२ | ९३७ | ८८६ | १,०८३ |
| झेकोस्लोव्हाकिया | ७४१ | ७१४ | ६१५ | ७३८ |
| पूर्व जर्मनी | ... | ७३८ | ७४९ | ७३८ |
| ग्रेटब्रिटन | ४२६ | ६५९ | ६२४ | ७९० |
| इटली | ३५२ | ७०९ | ६९९ | ३९९ |
| स्पेन | १५१ | ३०० | ५६२ | २९३ |
| इतर देश | ४,१२१ | २,६६४ | २,४४१ | ३,०२९ |
| एकूण बीटसाखर | ११,०५४ | १२,९४१ | १२,४८९ | १४,८१८ |
| **उसाची साखर** | | | | |
| क्युबा | ३,०१८ | ७,११० | ५,०७८ | ४,८१७ |
| ब्राझील | ९८५ | १,६३० | १,८०० | १,८३० |
| ऑस्ट्रेलिया | ८१० | ७२५ | ९१७ | १,२३० |
| भारत साखर | ९३१ | १,४८३ | १,३१२ | १,००१ |
| „ गूळ | २,०६० | २,२१८ | २,०१५ | २,२०० |
| फिलिपाइन्स | ९४० | ९६० | १,०१२ | १,१६९ |
| पोर्टोरिको | ९६२ | १,२१४ | १,०५४ | १,०६२ |
| हवाई | ८२० | ९११ | ९८१ | ९६५ |
| मेक्सिको | ३३३ | ७४० | ८३७ | ८८० |
| फॉर्मोसा | १,१५२ | ५१२ | ८९६ | ८०० |
| ब्रि. वे. इंडीज | ४०१ | ६७३ | ७४५ | ७८८ |
| इंडोनेशिया | १,३८० | ४९२ | ६५८ | ७५० |
| यु. स्टेट्स | ४०८ | ३७४ | ५३९ | ५२० |
| इतर देश | ३,८१६ | ५,०८३ | ५,३८८ | ६,०५१ |
| एकूण उस साखर | १८,०१६ | २४,१२५ | २३,२३६ | २४,०६३ |
| एकूण सर्व साखर | २९,९७० | ३७,०६६ | ३५,७२५ | ३८,८८१ |

**अहमदाबाद कलोल रेल्वे-रस्ता**—अहमदाबाद कलोल ह्या १७ मैलांच्या मार्गावर हवड रेल्वे-रस्ता बांधण्याचें रेल्वे बोर्डानें ठरविलें असल्याचें समजतें. हा रस्ता चालू सालींच बांधण्यांत येणार असून त्यासाठीं ९७ लाख रुपये खर्च येणार आहे. भुज आणि अंजीपूर ह्यांच्या दरम्यान असलेल्या निरुंद रेल्वेचेंहि मीटर गेज रेल्वेमार्गांत रूपांतर करण्यांत येणार आहे.

**शंखांपासून बांगड्या तयार करणार ?**—तुतिकोरीन आणि रामेश्वर ह्या ठिकाणीं नाना प्रकारचे शंख-शिंपले सांपडतात. त्यांचा उपयोग करून बांगड्या तयार करण्याचा ग्रामोद्योग चालू करतां येईल किंवा काय ह्यासंबंधीं मद्रास सरकार विचार करीत आहे. प. बंगाल सरकारला जरूर ते शंख पुरविण्यासाठीं सध्यां वाटाघाटी चालू आहेत. हा पुरवठा करूनहि मद्रास सरकारजवळ भरपूर शंख उरण्यासारखे आहेत.


# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिक्कोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,१७,००० |
| ठेवी | रु. ८२,२०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,०८,००,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५३ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.

ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२७ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.